भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क. ३१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/०१/२०१७

**१) संगनमत करुन अवैद्यरित्या ६ ब्रास रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १२/०१/२०१७ चे ०३.०० वा. दर. यातील सरतर्फे फिर्यादी हे आपल्या स्टॉपसह नाकाबंदी करीत असतांना यातील आरोपी ट्रक चालकांनी मालका सोबत संगनमत करुन रेती घाटातुन प्रत्येकी ६—६ ब्रास एकुण १८ ब्रास रेती कि. ३६,०००/—रु. अवैद्यरित्या चोरी करुन वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने त्यांच्या कडे रेती बाबत रॉयल्टी विचारना केली असता त्यानी कागदपत्रे सादर न केल्याने जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करुन ट्रक चालक व मालक यांचे विरुध्द पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. राऊत पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) घराचा ताला तोडुन आलमारीतील सोन्याचे दागीन्याची चोरी . :—**

दिनांक ११/०१/२०१७ चे १४.०० ते १८.०० वा दर. यातील फिर्यादी सौ. रत्नमाला नरेंन्द्र सार्वे वय ३४ वर्ष, रा. मांगली खापा यांनी आपल्या घराचे दाराला कुलुप लावुन चाबी भितीच्या आरशा जवळ लपवुन ठेवली शेतातवर काम करण्यास गेली कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण भिंतीच्या आरशा जवळ लपवुन ठेवलेली चाबीने समोरील दाराचा कुलुप खोलुन घरात प्रवेश करुन आलमारीत ठेवलेले राजारानी डोरले सोन्याचे ०२ ग्रॅम, सोन्याची गाठी ६२ मनी व पदक ०६ ग्रॅम, कानातील सोन्याचे झुमके ०४ ग्रॅम, सोन्याची अंगठी ०४ ग्रॅम, असा एकुण ३२,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे पवनी येथे कलम ४५४,३८० भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक ११/०१/२०१७ चे ०९.०० ते १६.०० वा. दर. यातील फिर्यादी राजेश आगाराम चव्हान वय ४० वर्ष, रा. महालगाव सुकळी हल्ली मुक्काम शिवनगरी खात रोड भंडारा यांनी आपली हिरो होंडा मोटार सायकल क्र. एमएच ५० एमबी १५९१ कि. ३०,०००/—रु. ची मोटार सायकल पंचायत समिती भंडारा येथील आवारात ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे भंडारा कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी तोडासे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) दारुबंदीच्या कारणावरुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १२/०१/२०१७ चे १७.३० वा. यातील फिर्यादी व पंच दारुबंदी समिती सदस्य राजापुर यांचे सोबत जावुन बालकदास चौधरी याची मोहफुलाची दारु पकडली असता आरोपी क. १ याने अश्लिल शब्दात शिविगाळ करुन दारु पकडायला लावले व दारुबंदीवाल्या बायांना अश्लिल शब्दात बोलुन आपल्या पोरी माझ्या कडे पाठवा असे बोलुन फिर्यादी यांचा मर्डर करतो व आरोपी क. २ हिने दारुबंदी महीलांना लज्जास्पद करुन अश्लिल शब्दात शिविगाळ केल्याने गावातील लोकांना त्याच्यापासुन धोका निर्माण झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे गोबरवाही कलम २९४,५०९,५०४,५०६,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. झोटींग पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**५) अवैध दारू अडयांवर धाडी . :—**

दिनांक १२/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. मोहाडी, कारधा, करडी, तुमसर, आंधळगाव, गोबरवाही, लाखनी, पालांदुर, पवनी येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण १३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ७२ लिटर हा.भ दारू+ १००० सडवा साहीत्य कि. ५७,८००/—रू. व १७ लिटर देशी दारु ८२० मिली लीटर + १ मोटार सायकल २४,८१९—रु. असा एकुण ८२,६१९ चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.